# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 19/12/2019 (गुरूवार)
# (सकाळ)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 7 कि.मी. अंतरावर नवरगाव येथे दिनांक 18/12/2019 चे 02.15 वा. ते 03.00 वा. दरम्यान रामटेक पोलीस पथक यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन रामटेक पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 40/बीएल – 1902 क्रमांकाच्या पिकअप टाटा गाडीला थांबविले. सदर वाहन तपासले असता त्यामध्ये एकुण 10 बैल कि. 1,00,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे आढळून आले. वाहनासह एकुण किंमती 4,00,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई सचिन ढकने, पो.स्टे. रामटेक यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(1)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 119 मुपोका सहकलम 83, 130, 177 मोवाका काद्दयान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ अरूण फाटे हे करीत आहे.

## घरफोडी

1) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 4 कि. मी. अंतरावर वित्तुबाबा मंदीर टाकळघाट येथे दिनांक 18/12/2019 चे 16.00 वा. ते 19.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अमर गुलाब रामटेके, वय 32 वर्ष, रा. बीड गणेशपुर हे परिवारासह टाकळघाट येथे कार्यक्रमात गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींच्या घरात मागील दारातुन प्रवेश करून कपाटातुन नगदी व सोन्या– चांदीचे दागिने असा एकुण 12,000/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार तरमळे हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर ठोमा लेआउट काटोल येथे दिनांक 17/12/2019 चे 13.30 वा. ते दिनांक 18/12/2019 ते 18.15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सतीश रामरावजी जाधव, वय 49 वर्ष, रा. ठोमा लेआउट, पंचवटी काटोल यांच्या घराचे गेटचे व दाराचे अज्ञात आरोपीने कुलूप तोडून घरात प्रवेश केला.

तसेच आरोपीने घरामधील कपाटातुन लेनोओ कंपनीचे लॅपटॉप जुने वापरते किं. 25,000/–रू., भेटवस्तु आलेले चांदीचे समई 6 नग, दिवे 5 नग किं. 5,000/–रू. व आवारातील एमएच–40/ऐजे–1528 क्रमांकाची ड्रीमयुगा मोटरसायकल किं 20,000/–रू. असा एकुण कि. 50,000/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. नरेन्द्र पिवाल हे करीत आहे.

3) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावर मौजा दुर्गा नगरी वार्ड क्र. 23, उमरेड येथे दिनांक 17/12/2019 चे 12.30 वा. ते 13.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गभा बेबीनंदा शिवशंकर ब्रम्हे, वय 40 वर्ष, रा. दुर्गा नगरी, उमरेड उघडया घरात संशयीत आरोपी नामे– रूपेश शंकर मुंडले, वय 33 वर्ष, रा. गोंडखैरी कळमेश्वर, नागपुर याने प्रवेश केले. यानंतर आरोपीने कपाटातुन नगदी 2,430/–रू. व सोन्या– चांदीचे दागिने 19,000/–रू. असा एकुण 21,430/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अजितसिंग ठाकुर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर